# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

तळ मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/ ६९१ /२०२२-२३ दिनांक : १० /०१/२०२३

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) देवपुजा शांतीनगर को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि. ०७/११/२०२२ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | नारळ | २० ते २५फुट | ०१ | १३ वर्ष | सदरची झाडे देवपुजा शांतीनगर को.ऑहौ.सो.लि. बिल्डींग सी-३७/३८, सेक्टर ३, शांतीनगर,मिरारोड(पु.)येथिल सोसायटीच्या आवारात असून झाडाची मुळे जमिनीतून बाहेर आली आहे.जोराच्या वाऱ्याने झाड पडुन जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, या कारणास्तव सदरील झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | जांभुळ | २० ते २५ फुट | ०१ | ०८ वर्ष | |
| २) उमेश जगन्नाथ केणी यांचे दि. २१/११/२०२२ रोजीचे पत्र. व दि.२८/०५/२०२१ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | नारळ | ३० ते ३५फुट | ०१ | १७ वर्ष | सदरचे झाड रा.काशिनाथ केणी हाऊस,गोडदेव गांव, विठ्ठल मंदिरा जवळ भाईदर (पु.) येथिल असून बाजुच्या झोपडपट्टी च्या दिशेने गेले असून झाडाचे नारळ व झाडाच्या झावळया वारंवार पडून नागरिकांना त्रास होत आहे.तसेच हे झाड झुकलेल्या अवस्थेत असून जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरील झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| ३) सर्वोदय एन्क्लेव्ह को.ऑ.हौ.सो.लि,यांचे दि.२२/११/२०२२ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | नारळ | २० ते २५ फुट | ०१ | १० वर्ष | सदरचे झाड सर्वोदय एन्क्लेव्ह को.ऑ.हो.सो.लि, न्यू गोल्डन नेस्ट रोड, कॅनरा बॅक जवळ भाईदर (पु.) येथिल सोसायटीच्या आवारात असून झाड पुर्णपणे झुकलेले आहे,जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, या कारणास्तव सदरील झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| ४) चंद्रेश मंदीर को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.०२/१२/२०२२ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | पिंपळ | १५ ते २० फुट | ०१ | ०८ वर्ष | सदरचे झाड चंद्रेश मंदीर को.ऑ.हौ.सो.लि.,सर्वे नं.५४३,हिसा नं ३,लोढा कॉम्पलेक्स,मिरारोड (पु) येथिल सोसायटीच्या आवारात असून बिल्डींगच्या संरक्षण भिंतीला टेकून उभे असून झाड केव्हाही पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकरता येत नाही.या कारणास्तव सदरील झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (वृक्ष प्राधिकरण), उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**(कविता बोरकर)**
**सहाय्यक आयुक्त तथा**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**